# ५. आंतरराष्ट्रीय राजकारणातील मुख्य मुद्दे

## अ) दहशतवाद :-

१. दहशतवादाचा अर्थ सांगून कारणे व परिणाम सांगा.

→ वर्तमान आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक अभ्यासाचे विषय आहेत. उदा:- पर्यावरणवाद, मानवीहक्क, दहशतवाद, वांशिक संघर्ष, स्त्रियांवरील अत्याचार आणि दहशतवाद ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याने दहशतवाद्याच्या समस्यांचे गांभिर्य आंतरराष्ट्रीय समुदायाला जाणवले हा हल्ला ओसामाबिन लादेन या दहशतवाद्याच्या अलकायदा या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेने केला. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जपान, स्पेन, रशिया, चिन, भारत अशा अनेक राष्ट्रांना दहशतवादाचा सामना करावा लागत आहे. अमेरिका, ब्रिटन यांनी संयुक्तपणे दहशतवादाच्या विरोधात आंतरराष्ट्रीय स्तरावर आघाडी स्थापन केली आहे. अमेरिकेने अफगाणीस्तानवर लष्करी कारवाई करून दहशतवादाचे केंद्र असणाऱ्या तालीबानी शासनाला उध्वस्त केले.

राजकीय उद्दिष्टपुर्तीसाठी हिंसाचाराचा वापर केला जातो. फ्रेन्च राज्यक्रांतीपासून दहशतवादाचा वापर केला जातो. २० व्या शतकामध्ये दहशतवाद संघटित शक्ती म्हणून उदयाला आला. विसाव्या शतकात दहशतवादाला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. आज एक राज्यक म्हणून दहशतवादाचा उल्लेख होत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे दहशतवादी संघटनांच्या कार्यपध्दतीत व साधनामध्ये अमुलाग्र बदल झाला आहे.

दहशतवाद्याच्या संकल्पनेचा विकास खालील टप्यातून झालेला आहे.

१) दुसऱ्या महायुध्दापुर्वीचा भारतातील क्रांतीकारी दहशतवादाचा टप्पा.

2) 1950 च्या दशकातील पश्चिम आशियातील दहशतवाद
3) 1960 आणि 1970 च्या दशकातील युरोपमधील दहशतवाद
) 1980 च्या दशकातील धार्मिक मुलतत्ववादाच्या भावनेने प्रेरित दहशतवाद.
) शितयुध्दोतर काळातील आंतरराष्ट्रीय दहशतवाद.

* दहशतवादाच्या व्याख्या :-

दहशतवाद या संकल्पनेकडे अभ्यासकांनी विविध अर्थाने मत व्यक्त केले आहे.

) राजकीय उद्दिष्टासाठी हिंसेच्या साधनांचा वापर करणे म्हणजे दहशतवाद होय.

) पेग्वीन राज्यशास्त्र शब्दकोशानुसार अमुलाग्र राजकीय आणि सामाजिक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने शासनावर दबाव आणण्यासाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब करणे म्हणजे दहशतवाद होय.

) B.M. जेन किन्सच्या मते हिंसेची धमकी किंवा व्यक्तीगत दहशतीची कृती करून प्रामुख्याने दहशतीद्वारा भिती निर्माण करण्याच्या दृष्टीने आखलेली योजना म्हणजे दहशतवाद होय.

वरील दहशतवाद संकल्पनेच्या सर्व व्याख्या भिती दरारा व हिंसेतून शासन व लोकमतावर दबाव आणण्याच्या प्रक्रियेला स्पष्ट करतो. दहशतवाद शासन विरोधी कृती समजली जाते. परंतु अनेक राष्ट्रांनी व तेथील शासनाने दहशतवादी साधनांचा वापर इतर राष्ट्रांविरुद्ध केला आहे.

* दहशतवादाची कारणे :-

सध्याच्या जगात दहशतवाद ही वैश्विक समस्या बनली आहे. पुर्वीपासून अनेक संघटना दहशतवादाच्या कारणांचा शोध घेत आहे. दहशतवादाच्या कारणात सारखेपणा नाही. राष्ट्र व विभागनिहाय त्यात वेगळेपणा आहे. यातील काही प्रमुख कारणे खालील प्रमाणे सांगता येतील.

1) अन्याय व अत्याचार :-

दहशतवादाच्या सामाजिक कारणातील अन्याय व अत्याचार हे एक मुख्य कारण आहे. समाजातील सबळ लोकांनी दुर्बल लोकांवर अत्याचार केला आहे. सबळ राष्ट्रांनी कमकुवत राष्ट्रांवर पण अन्याय व अत्याचार केलेला आहे. या अन्याय व अत्याचाराविरुद्ध प्रस्थापित व्यवस्था न्याय देण्यास असमर्थ ठरते. अशा वेळी अन्यायग्रस्त व शोषण झालेले व्यक्ती दहशतवादाचा मार्ग स्विकारतात.

2) दारिद्र्य व उपासमार :-

अलीकडील काळात गरीब व श्रीमंत यांच्यामधील दरी वाढत आहे. व्यक्ती राष्ट्राच्या पातळीवर साधारणपणे ही दरी अधिक वाढत आहे. बऱ्याच विकसित राष्ट्रातही दारिद्र्य व उपासमारीचे प्रश्न आहेत याउलट गरीब लोकांना पोटभर अन्न देण्यात व त्यांचे दारिद्र्य संपविण्यात शासन अपयशी होत आहेत. याउलट गरीब लोकांनाच फसवणूक करून आपली सत्ता टिकवण्याचे प्रयत्न विकसित, विकसनशील व अविकसित राष्ट्रांत होत आहेत. त्यामुळे दारिद्र्य, उपासमार व आर्थिक विषमतेला कंटाळून अनेक लोक दहशतवादी मार्गाचा स्विकार करतात.

3) बेकारी :-

दिवसेंदिवस जागतिक लोकसंख्येत वाढ होत आहे. परिणामत: पात्रताक्षम व योग्यता असणाऱ्या उच्च शिक्षित तरुण व तरुणीचे प्रमाण वाढत आहेत. तर दुसऱ्या बाजूने या तरुणांच्या हाताला योग्य काम मिळत नाही. परिणामत: उदारनिर्वाह भागवण्यासाठी चुकीच्या मार्गाने पैसा कमवण्याकडे अशा युवकांचा कल वाढत आहे.

4) धर्मांधता :-

धर्म आणि राजकारण यांची सांगड घालून सामाजिक वातावरण ~~बिघ~~ बिघडविण्याचा अनेक धर्मांध व्यक्तीकडून होत आहे. धर्मगुरु, धर्मप्रचारक, धर्ममार्तंड यासह सांप्रदायिक विचारसरणीचा स्विकार करणारा व्यक्तीकडून लोकांच्या धार्मिक भावना भडकवण्याचे प्रयत्न होतात. दिशाहीन, अमानवीय, धार्मिक तत्वज्ञानाची मांडणी केली जाते. स्वधर्माबद्दलचे प्रेम व इतर धर्माबद्दलची घृणा जागृत केली जाते. अशा वेळी धर्मांध व्यक्ती धर्माच्या प्रचारासाठी दहशतवादाचा मार्ग स्विकारतात.

5) नैतिक मुल्यांचा ऱ्हास होणे :-

वर्तमान समाज व शासनव्यवस्थेचा विचार करता, नैतिक मुल्य लोप पावत आहेत. समाज, राजकारण, धर्मकारण अशा सर्वच क्षेत्रात भ्रष्ट व अनैतिक मार्गाचा अवलंब केला जातो. अनैतिक मार्गाचा अवलंब करून निवडणूक जिंकली जाते. लोकशाही मुल्य पायदळीत तुडविली जाते. अशा मार्गाचा अवलंब केला जातो. अशा प्रसंगी न्याय मिळावा व व्यवस्थेत बदल

व्हावा या हेतूने जनता दहशतवादी मार्गाचा अवलंब करते.

6) शैक्षणिक अपयश :-

शिक्षण माणसातील माणूसपण टिकवून ठेवते. माणसाला माणूस बनवण्याची ताकत शिक्षणात आहे. परंतु शिक्षणाला प्राप्त झालेले व्यावसाईक स्वरूप शिक्षण हे अनुत्पादक क्षेत्र आहे. शिक्षणातील गुंतवणूक फलदायी नसते. अशी शिक्षणाबद्दलची होणारी मांडणी शिक्षणातील भ्रष्टाचार अयोग्य व क्षमता नसलेल्या व्यक्तींचा सहभाग आणि शिक्षण घेऊन ही उदारनिर्वाहाचे प्रश्न न सुटने व शिक्षणातील अपयशाने निराश झालेले विद्यार्थी दहशतवादाचा अर्थ स्विकारतात.

7) वंशभेद :-

जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात वांशिक भेद आहेत. ज्यामध्ये श्रेष्ठवंशीय लोक कनिष्ठ वंशीय लोकांना कमी लेखतात. हीन दर्जाची वागणूक देतात. उदा:- दक्षिण आफ्रिकेतील काळ्या व गोऱ्या वंशाच्या वाद. जमिनीतील आर्य व ज्यू वंशीय वाद, श्रीलंकेतील सिंहली व तमिळी वाद, इंग्लंडमधील काळा - गोरा संघर्ष इत्यादी जगातील वंशवादाची उदाहरणे आहेत. या वंशवादामध्ये वंचित, शोषित व कनिष्ठ लोक विद्रोहाची भुमिका स्विकारतात. त्यांचा हा विद्रोह दहशतवादी असतो.

याशिवाय राजकीय पक्षांमधील सत्ता संघर्ष दहशतवादाला खतपाणी घालण्याचे धोरण, कुटीरतावादी प्रवृत्तीचा स्विकार अशी अनेक कारणे दहशतवादाची सांगता येतात.

* दहशतवादाचे परिणाम :-

दहशतवाद सध्याच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्वाची समस्या आहे. दहशतवाद गंभीर परिणाम करणारी समस्या आहे. दहशतवादाचे परिणाम खालील प्रमाणे सांगता येते.

1) दहशतवादामुळे आर्थिक नुकसान होते.
2) दहशतवादामुळे जिवीत हानी होते.
3) दहशतवादामुळे पायाभूत सेवा सुविधांचा विनाश होतो.
4) दहशतवादामुळे बौध्दीक संपत्तीचे नुकसान होते.
5) दहशतवादामुळे भितीजन्य वातावरण राहते. दहशतवाद युध्दास खतपाणी घालतो.
6) दहशतवाद राष्ट्राराष्ट्रात शत्रुत्वाची भावना निर्माण करतो.
7) दहशतवाद जागतिक हिंसा व असुरक्षिततेची भावना वाढवतो. दहशतवाद आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला आव्हान देतो.
8) दहशतवाद राष्ट्रातील जनतेचे मानसिक खच्चीकरण करतो. दहशतवाद शत्रुत्वाची भावना वाढवतो.
9) दहशतवाद संरक्षण क्षेत्रालावरील राष्ट्रांचा खर्च वाढवतो.
दहशतवादामुळे सामाजिक व आर्थिक विकास खुंटतो.
दहशतवादामुळे राजकीय व्यवस्थेविषयीचे प्रश्नचिन्ह लोकांमध्ये निर्माण होतात.
10) दहशतवादामुळे शासनाच्या जनतेवरील विश्वास नष्ट होतो.

# वरील सर्व नकारात्मक परिणाम दहशतवादाचे आहेत. दहशतवादाचे काही सकारात्मक परिणाम आहेत.

1) दहशतवादामुळे जनतेत एकसंधपणाची भावना निर्माण होते.
2) दहशतवादामुळे जनतेत राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागते.

3) दहशतवादामुळे जनतेत बलिदानाची भावना निर्माण होते.
4) दहशतवादामुळे आंतरराष्ट्रीय समुदायात एकवाक्यता निर्माण होते.
5) दहशतवाद विरोधी सामुहीक कार्यवाही करण्याच्या दिशेने जग विचार करु लागते.
6) दहशतवादामुळे पुन्हा सरकार बनवण्याची संधी मिळते.
7) दहशतवादामुळे सत्तांतर घडू शकते.
8) दहशतवादामुळे भरकटलेल्या तरुणांना जीवन जगण्याची नविन संधी मिळू शकते..

* दहशतवादाचे प्रकार :–

आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवादी संघटनेचे कार्यक्षेत्र, त्यांची उद्दिष्टे, कार्यप्रणाली यांच्या आधाराव दहशतवादाचे पाच प्रकार दिसून येतात.

1) राष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद :–

या दहशतवादाचे कार्यक्षेत्र एखाद्या राष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादीत असते.

उदा :– श्रीलंकेतील लिट्टे संघटना Liberation Tigers of Tamil Eelam - LTTE, हमास (पॅलेस्टाईन) आयरिश रिपब्लिकन आर्मी (England) इत्यादी

2) आंतरराष्ट्रीय दहशतवाद :–

जगातील अनेक राष्ट्रांमध्ये या दहशतवादाचे जाळे पसरलेले असते. उदा :– अल कायदा, अबु निदाल संघटना इत्यादी अलकायदा संघटनेचे जगातील 50 पेक्षा अधिक राष्ट्रात जाळे पसरलेले आहे 11 सप्टेंबर 2001 रोजी अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटर व पेंटागॉन इमारतीवर अल कायदा संघटनेने हल्ला केला होता.

3) सीमापार दहशतवाद :-

दहशतवादाच्या या प्रकारात दहशतवादी संघटनेचे केंद्र एका देशामध्ये तर कार्यक्षेत्र दुसऱ्या देशामध्ये असते. उदा:- जम्मू काश्मीरमधील हिंसाचाराला कारणीभूत असणाऱ्या अनेक दहशतवादी संघटनांचे केंद्र पाकिस्तानमध्ये आहे. पण त्यांचे कार्यक्षेत्र भारत असते. सीमापार दहशतवादाला ईस्त्राइल, रशिया, चिन हे राष्ट्र बळी पडले आहेत.

4) राज्य पुरस्कृत दहशतवाद :-

जेव्हा एखादे राष्ट्र शेजारील राष्ट्रामध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक दहशतवादी साधनांचा वापर करते तेव्हा त्यास राज्य पुरस्कृत दहशतवाद म्हणतात. या दहशतवादी प्रकारात हिजबुल मुजाहिदीन, लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मुहम्मद हा संघटनांचा समावेश होतो. या संघटनांचे केंद्र पाकिस्तानमध्ये आहे या संघटनांना पाकिस्तानकडून आर्थिक व लष्करी मदत मिळते.

5) धार्मिक आणि वांशिक भावनेने प्रेरित दहशतवाद :-

सध्या जगामध्ये अस्तित्वात असलेला दहशतवाद धार्मिक भावनेने प्रेरित आहे. धार्मिक आणि वांशिक भावनेने प्रेरित दहशतवादाचे प्रमाण वाढत आहे. कारण धार्मिक व आर्थिक अल्पसंख्यांकांना वाटणारी असुरक्षितता धार्मिक अल्पसंख्यांकावर होणारे अत्याचार स्वतंत्र धार्मिक आणि वांशिक ओळख गमावण्याची भिती पाश्चिमात्य संस्कृतीचा वाढता प्रसार इत्यादी अलकायदा आणि हिजबुल मुजाहिद्दीन या संघटना धार्मिक आणि वांशिक भावनेने प्रेरित आहेत.

सध्याच्या दहशतवादाकडे पाहता वरील काही प्रकार दहशतवादाचे सांगता येते. या सर्व प्रकारात दहशतवादी खालील साधनांचा वापर करतात.

1) आत्मघातकी पथकांचा वापर करणे.
2) बॉमस्फोट करणे
3) गोळीबार घडवून आणणे.
4) RDX स्फोटकांचा वापर करणे. उदा:- पुलवामा दहशतवादी हमला.
5) राजकीय व्यक्तींची हत्या करणे.
6) प्रसिद्ध व्यक्तींची अपहरण करणे.
7) विमानाचे अपहरण करणे.
8) आर्थिक व्यापारी आणि संरक्षण दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळावर हल्ले करणे.
9) शासकीय कार्यालयावर व राजकीय संस्थांवर हल्ले करणे.
10) महत्त्वाचे व्यक्ती प्रतिनिधी यांना ओलीस (डांबून) ठेवणे इत्यादी.

* दहशतवादाचे उद्दिष्टे :-

दहशतवाद विविध उद्दिष्याने निर्माण होत असतो या उद्दिष्ट प्राप्तीसाठी हिंसाचाराचा वापर केला जातो. प्रत्येक दहशतवादी संघटनेचे उद्दिष्ट वेगवेगळे असते. काही दहशतवादी संघटना स्थानिक प्रश्नासाठी तर काही दहशतवादी संघटना आंतरराष्ट्री उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी प्रयत्नशील असतात. सर्वसाधारणपणे दहशतवादाची खालील उद्दिष्टे आहेत

1) स्वातंत्र्य प्राप्तीचे उद्दिष्ट :-

प्राचीन काळापासूनच राजकीय स्वातंत्र्य साठी हिंसाचाराचा वापर केला जातो. अलीकडील काळात

त्याचे प्रमाण वाढले आहे. आशिया, आफ्रिका खंडातील अनेक वसाहतींनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब केला आहे. तर ब्रिटिशांनी देखील स्वातंत्र्य चळवळ दडपण्यासाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब केला आहे. ब्रिटिशामध्ये दहशत निर्माण करणे. अन्यायाचा सुड घेणे व स्वातंत्र्य प्राप्तीच्या मागणीकडे सरकारचे लक्ष वेधून घेणे इत्यादी कारणामुळे क्रांतीकारी दहशतवादाचा स्विकार भारतीयांनी केला.

२) स्वतंत्र व सार्वभौम राज्याची निर्मिती करणे:-

दहशतवादी घटनांच्या माध्यमातून स्वतंत्र व सार्वभौम राज्याच्या निर्मितीसाठी अनेक संघटना काम करत आहेत. उदा:- श्रीलंकेतील लिट्टे, पॅलेस्टाईन मधील हमास, इंग्लंडमधील आयरिश रिपब्लीकन आर्मी, हिजबुल मुजाहिदीन, लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मुहम्मद इत्यादी.

राजकीय व सामाजिक परिवर्तन करणे:-

राजकीय आणि सामाजिक परिवर्तनाच्या उद्दिष्टासाठी दहशतवादी संघटना सक्रीय आहेत. जगातील सर्व मुस्लिम राष्ट्रांना एकत्र करुन इस्लाम धर्मावर आधारीत राजवटीची स्थापना करणे. अलकायदा संघटनेचे उद्दिष्ट आहे.

अन्यायाचा सुड किंवा बदला घेण्याचे उद्दिष्ट:-

राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक स्वरूपाच्या अन्यायाचा, अत्याचाराचा सुड किंवा बदला घेण्याच्या उद्दिष्टाने ही दहशतवाद संघटना काम करत आहेत. उदा:- स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील भारतीय क्रांतीकारी दहशतवादी संघटना,

अलकायदा ही संघटना अमेरिका आणि त्यांच्या सहकारी राष्ट्रावर सुड घेण्याचा प्रयत्न करते. हा प्रयत्न 11 सप्टेंबर 2001 रोजी अमेरिकेने दहशतवादावर हल्ला करून केला आहे. याशिवाय इंग्लंड, स्पेन, जपान फ्रान्स ही राष्ट्रे या संघटनांच्या लिस्टमध्ये आहेत.

5) प्रश्नांचे त्वरीत समाधान शोधणे :-

दहशतवादी संघटनांचा लोकशाही मार्गाने प्रश्न सोडविण्यावर विश्वास नसतो या संघटनांना तात्काळ व क्रांतीकारी बदल हवे असतात. या बदलासाठी ते हिंसाचाराचा वापर करतात. परंतु शांततेच्या मार्गाने प्रश्न सुटले जातात. यावर दहशतवाद्यांचा विश्वास नाही. उदा:- हमास संघटना (पॅलेस्टाईन प्रश्न), लिट्टे (श्रीलंका) तामीळी व सिंहली संघर्ष आणि भारत व पाकिस्तानमधील जम्मू काश्मिरचा प्रश्न

6) आपले प्रश्न व मागण्यांकडे लक्ष आकर्षित करणे :-

आपल्या प्रश्नाकडे देशातील व देशाबाहेरील शासन व जनतेचे लक्ष आकर्षित करणे, दहशतवादी संघटनांचे उद्दिष्ट आहे. आपल्याकडे लक्ष आकर्षित करण्यास ही अनेक साधनांचा, तंत्रांचा अवलंब दहशतवादी करतात. ओसामा बिन लादेन ने अलकायदा संघटनेच्या मागणीकडे जगाने लक्ष द्यावे म्हणून अमेरिकेवर हल्ला केला. वरील अनेक उद्दिष्टांसाठी दहशतवादी संघटना कार्य करतात.

दहशतवादामध्ये खालील काही बाबींचा प्राधान्याने वापर केला जातो.

1) हिंसाचाराचा जाणिवपुर्वक वापर

II) दहशतीचे दबाव तंत्र.

प्रसिद्धीला महत्त्व
iii) अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न
iv) लोकशाही मुल्यांना स्थान नाही.
v) विचारसरणीचा आधार
vi) दहशतवादातून युद्धाला चालना
vii)

अशा विविध बाबी दहशतवादातून स्पष्टपणे जाणवतात. म्हणून दहशतवादामध्ये मानवतावादी मुल्यांना नैतिकतेला स्थान नसते.

उपाययोजना:- दहशतवादाच्या निर्मुलनासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्थरावर अनेक उपाय केले जातात. दहशतवाद ही एकाकी नष्ट होणारी संकल्पना नाही. तिच्या निर्मुलनासाठी अनेक कालखंडापासून प्रयत्न होत आहेत. या प्रयत्नांचे विभाजन तीन भागामध्ये करता येईल.

i) आंतरराष्ट्रीय पातळीवरील उपाय
ii) राष्ट्रीय पातळीवरील उपाय
iii) सर्वसाधारण उपाय

i) आंतरराष्ट्रीय पातळीवरील उपाय:-

दहशतवादाचे निर्मुलन व्हावे म्हणून आंतरराष्ट्रीय ~~पातळीवरील~~ पातळीवर आजपर्यंत अनेक उपाय करण्यात आले. यामध्ये टोकीओ हेग मॉन्ट्रीअल याठिकाणी विविध परिषदा घेण्यात आल्या.

- राष्ट्राराष्ट्रात परस्पर सहकार्य व सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.
- आंतरराष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वपुर्ण व्यक्ती, स्थळे, लष्करी केंद्रे यांना संरक्षण देण्यात आले.
- सर्व राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करावे असे बंधन टाकण्यात आले.
- शस्त्रास्त्र स्पर्धा थांबावी व निशस्त्रीकरण व्हावे म्हणून अनेक करार करण्यात आले.

उदा:- NPT, PTBT, CTBT
- विमानांचे अपहरण रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे कायदे बनवले.
- दहशतवादी संघटनांना थारा न देणे व सहकार्य न करणे अशी भुमिका घेण्यात आली.
- नशील्या व मादक पदार्थांच्या तस्करीवर बंदी घालणे.
- मादक पदार्थांच्या उत्पादनावर व व्यापारावर राज्यांनी नियंत्रण आणणे.
- एखाद्या राष्ट्राला दहशतवादी राष्ट्र घोषित करण्याच्या दिशेने प्रयत्न करणे. तसा ठराव युनोमध्ये घेणे
- एखाद्या दहशतवाद्याला दहशतवादी म्हणून घोषित करणे.
- दहशतवादी संघटना व दहशतवाद्यांच्या खात्मा करण्यासाठी लष्करी कार्यवाही करणे.

ii) राष्ट्रीय पातळीवरील उपाय:-
- दहशतवादी संघटनांच्या प्रमुखाशी चर्चा करणे. त्यांचे प्रश्न समजावून घेणे.
- दहशतवाद्यांचे प्रश्न सोडवणे.
- कायदेशीर मार्गाने दहशतवाद्यांच्या योग्य मागण्या मंजूर करणे.
- दहशतवादी संघटनांच्या प्रमुखांवर खटले भरून त्यांना तुरुंगात डांबणे.
- दहशतवाद्यांच्या केंद्रावर छापे घालणे.
- आपल्या भौगोलिक सीमेवर कडक पहारा देणे.
- राष्ट्रविरोधी कार्यवाह्या करणाऱ्या नेत्यांचे संरक्षण काढून घेणे. त्यांना मिळणारी सर्व मदत बंद करणे.

दहशतवाद विरोधात लोकजागृती करणे.
दहशतवाद्याची माहिती सांगणाऱ्याला बक्षिस देणे.
दहशतवादयाची माहिती सांगणाऱ्याचे नाव गुप्त ठेवणे.
लष्करात जवानांची भरती करणे.
लष्करातील जवानांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रे उपलब्ध करुन देणे.
शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे.
गरिबी, दारिद्र्य, बेकारी व उपासमारीसारख्या समस्या सोडवणे.

सर्वसाधारण उपाय:-

(1) शोषण, पिळवणूक, अन्याय व अत्याचाराविरोधी तात्काळ प्रतिबंधात्मक उपाय करणे.
अपराधास तात्काळ शिक्षा करणे.
शोषित व अन्यायग्रस्तांना पिडीतांना त्वरीत न्याय ~~करणे~~. देणे.
प्रत्येक व्यक्तीच्या मुलभूत गरजा भागवण्याचे प्रयत्न करणे.
रोजगारांची व नोकऱ्यांची निर्मिती करणे.
कौशल्य व क्षमतेनुसार संधी उपलब्ध करुन देणे
प्रादेशिक असमतोल दूर करणे.
सर्व राज्यांना विकासाची समान संधी देणे.
नागरीकांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती व राष्ट्रवादाची भावना जागृत करणे.
देशातील भ्रष्टाचार, सावकारी प्रवृत्ती या सर्वांना आळा घालणे असे विविध उपाय दहशतवादाच्या बाबतीत करता येतात.

* स्त्रिवाद (Feminism) :-

स्त्रिवाद हे राज्यशास्त्रातील आधुनिक विचारसरणी आहे. स्त्रिवाद सामाजिक प्रक्रियेची महत्त्वपुर्ण संकल्पना आहे. स्त्रि मुक्तीचा मार्ग म्हणून स्त्रिवादाकडे पाहिले जाते. प्राचीन काळापासूनच स्त्रियांचा समाजातील दर्जा दुय्यम राहिलेला आहे. प्रत्येक ठिकाणी पुरुष प्रधान पुरुषसत्ताक व पितृसत्ताक संस्कृती दिसून येते. भारतीय वर्णव्यवस्थेने सर्वात खालच्या वर्गात स्त्रियांची गणना केली. स्त्रियांना माणूस म्हणूनही दर्जा नाकारला होता. तिचे हक्क व कर्तव्य मर्यादीत केले होते.

इस्लाम धर्मातील तलाक व हलाला या दोन्ही पद्धती स्त्रियांना दुय्यम लेखणारे आहेत. सर्व धर्म हे पुरुष रचित साहित्यातून निर्माण झालेले आहेत. जे. एस. मीलने ब्रिटिश संसदेत स्त्रियांच्या अधिकाराचा प्रस्ताव मांडला. मीलनेच सबजेक्शन ऑफ विमेन हा स्त्रि-पुरुष समतेशी मांडणी करणारा ग्रंथ लिहिला भारतात. 1960 नंतर स्त्रिवादी चळवळीचा उदय झाला. स्त्रिवादाच्या संदर्भात मेरी वॉल्फस्टन क्राफ्टने 'हिंडी केशन ऑफ विमेन' नावाचा ग्रंथ 1792 मध्ये प्रसिद्ध केला. सिमॉन दी बुआ या महिला लेखिकेने 1948 साली स्त्रिवादीची मांडणी करणारा 'The second sex' हा ग्रंथ लिहिला हा ग्रंथ स्त्रिवादाचा बायबल समजला जातो. या ग्रंथात सिमॉन दी बुआ असे म्हणते. 'स्त्रि ही जन्मत नसते. तर ती घडविली जाते.' दुसऱ्या महायुद्धानंतर स्त्रियांचे अधिकार या संदर्भात संयुक्त राष्ट्र संघटनेत चर्चा झाली 1995 ला जागतिक महिला परिषद घेण्यात आली या परिषदेमध्ये स्त्रिचे अधिकार, हक्क, स्वातंत्र्य हे

...ज्ञाननिर्मिती आहेत अशी घोषणा देण्यात आली.

* व्याख्या:-

स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार व हक्क मिळावेत असा हेतू या विचारसरणीचा आहे. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची स्थिती तिची भुमिका, तिचे अधिकार, परावलंबित्व, अन्याय, अत्याचार व उपाय या सर्वांचा विचार स्त्रीवादात होतो. स्त्रीवादाचा उदय पित्रसत्ताक कुटुंबपद्धतीतून झाला आहे. स्त्रीवाद लिंग समानतेबाबत विचार मांडतो. स्त्रीवाद हा ज्ञानात्मक युक्तीवाद आहे. स्त्रीवादाच्या व्याख्या खालील प्रमाणे सांगता येतील.

1) बाऊन वेबरलेच्या मते:- "स्त्रीवाद म्हणजे स्त्री-पुरुष संबंधातील विषमता पुर्वक व्यवहार व व्यवस्था नष्ट करुन लिंगभेद निरपेक्ष समाज निर्माण करु पाहणारे एक चळवळ आहे".

2) लिंडा गार्डनच्या मते:- "स्त्रियांचे दुय्यमत्व आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षांचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद होय."

3) जॅनेट रॅडक्लीफ रिचर्डसच्या मते:- "स्त्रीवाद म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून सामाजिक न्यायाची चळवळ आहे."

स्त्रीवादी विचारसरणीच्या वरील सर्व व्याख्यांवरून असे म्हणता येईल की स्त्रीवाद ही एक स्त्रीयांना गुलामीतून मुक्त करणे शोषणरहित वर्गरहित व पुरुषांच्या बरोबरीने समाजात समतेचा दर्जा व स्थान प्राप्त करुन देणारी चळवळ आहे. स्त्री आणि पुरुष जन्मत: समान आहेत. ही मध्यवर्ती संकल्पना स्त्रीवादाची आहे.

स्त्रिवादी वैशिष्ट्ये :- स्त्रिवादी विचारसरणीची ओळख
* खालील लक्षणातून होते.

1) स्त्रीवाद स्वातंत्र्याचे संवर्धन :-

स्त्रीवादाची विचारसरणी स्त्रीस्वातंत्र्याचे समर्थन करते. एडमंड बर्कने "ए विंडीकेशन ऑफ दी राईटस ऑफ मॅन" या ग्रंथात पुरुषी वर्चस्वाचे समर्थन केले. याला विरोध म्हणून मेरी वुल्फस्टोन क्राफट यांनी अविंडीकेशन ऑफ दी राईटस ऑफ वुमन हा ग्रंथ लिहिला या ग्रंथात स्त्रीने भावना प्रधानता व सहनशीलतेचा त्याग करावा मानसिक व शारीरिक दृष्ट्या सक्षम व्हावे पुरुषाप्रमाणेच स्त्रियांना शिक्षण व चांगली वागणूक मिळावी संधीची समानता समान न्याय स्वातंत्र्य या बाबी पुरुषाप्रमाणेच स्त्रियांना ही मिळाव्यात.

2) स्त्रि-पुरुष समतेचा आग्रह :-

स्त्रिवादाची विचारसरणी स्त्री-पुरुष समतेच्या तत्वज्ञानावर आधारणी आहे. स्त्रियांचे स्वातंत्र्य व विकास करण्यासाठी स्त्री-पुरुष समता आवश्यक आहे. स्त्री समतेसाठी आवश्यक कायदे करावेत. या कायद्याची अंमलबजावणी करावी. स्त्री-पुरुष समतेशिवाय सामाजिक व राजकीय व्यवस्थेचा रथ सुरळीत चालणार नाही ही भुमिका स्त्रिवाद्यांनी मांडली आहे.

3) लैंगिक क्रांतीचे समर्थन :-

स्त्रीवादाच्या जहाल स्त्रीवाद या प्रकाराने लैंगिक क्रांतीचे समर्थन केले आहे. केट मिलेटच्या मते बलात्कार ही फक्त कामवासनेसाठीची कृती

नसते तर त्यात आक्रमण द्वेष अमानुषता आणि स्रीयांचे व्यक्तीमत्त्व संपवणारी कृती आहे. या सोबतच लैंगिक क्रांतीचे समर्थन करताना फुरीयरने स्पष्ट केले आहे. स्रियांनी विवाह संस्थेला विरोध करुन समलिंगी लैंगिक संबंध प्रस्थापित करावयास हवेत. स्रियांनी कृत्रिमरित्या गर्भधारणा करावी स्रियांनी पुरुषांवर कोणत्याच बाबतीत अवलंबून राहू नये पुरुष प्रधान व्यवस्थेच्या विरोधी लैंगिक क्रांतीचे समर्थन करावे.

राज्याच्या हस्तक्षेपास मान्यता :-

स्रीवाद्यांच्या मते सार्वजनिक जिवनात स्रियां ना महत्वाचे स्थान प्राप्त करुन देण्यासाठी राजसंस्थेने पुढाकार घ्यावा. कारण व्यक्तीच्या गरजा पुरवणे शांतता व सुव्यवस्था राखूने व्यक्तीचे संरक्षण करणे ही राज्यसंस्थेची जबाबदारी असते. स्रीयांना विकासासाठी पुरेशी संधी उपलब्ध करुन देणे राज्याचे कर्तव्य आहे.

स्रीवादी साहित्य निर्मितीस प्रेरणा :- (प्राधान्य) :-

स्री सुधारणा व जागृती घडविण्यासाठी स्रीवादी साहित्याकडे प्रभावी माध्यम म्हणून पाहिले जाते. स्रीवादी साहित्य निर्मितीत महात्मा बसवेश्वर, अक्क महादेवी, संत मिराबाई, जनाबाई, वारकरी संप्रदाय, राजाराम मोहन राय, महात्मा ज्योतिबा फुले, ताराबाई शिंदे, महात्मा गांधी, गोपाळ गणेश आगरकर इत्यादींनी पुढाकार घेतला या साहित्यातून त्यांनी स्री-पुरुष विषमता स्रीयांचे अधिकार, स्रीयांची क्षमता याची जाणीव जगाला करुन दिली. इतिहासातील शूर, पराक्रमी, व धाडसी महिलांची ओळख जगाला करुन दिली. उदा:- कित्तूरची राणी चन्नम्मा, बेलवडीची राणी मल्लम्मा, झाशीची

राणी लक्ष्मीबाई (मणिकर्णिका), जिजाबाई, रझिया सुलताना, चाँदबिबी, ताराबाई शिंदे, अहिल्याबाई होळकर, येसूबाई, इंदिरा गांधी, विजया लक्ष्मी पंडीत निर्मला सीतारामण (संरक्षण मंत्री) इत्यादी.

6) स्त्रीयांच्या भुमिकेत बदल घडविणे :-

स्त्रीवाद्यांच्या मते स्त्रीयांच्या भुमिकेत बदल घडविण्याची आवश्यकता आहे. हा बदल सामाजि राजकीय व आर्थिक क्षेत्रात घडविणे आवश्यक आहे. 'चूल आणि मूल' याशिवाय राजकारण, प्रशासन, प्रसारमाध्यमे, विज्ञान व तंत्रज्ञान, शिक्षण, कला, उद्योग, सेवा क्षेत्र अशा अनेक क्षेत्रात महिलांची योगदान वाढले पाहिजे स्त्री पैसे कमवते परंतु तिला कमवलेले पैसे खर्च करण्याचाही अधिकार असावा. असा अधिकार नसल्यामुळे त्या मागे राहिल्या आहेत. महिलांचा राजकीय प्रक्रियेत सहभाग वाढला पण निर्णय निर्धारणातील सहभाग वाढला नाही. तो वाढणे गरजेचे आहे. याची जाणीव स्त्रीवादाची विचारसरण करुन देते.

7) स्त्रीयांच्या समस्यांची सोडवणूक करणे :-

स्त्रिवादाने स्त्रियांचे हितसंबंधाचे समर्थन केले यासाठी त्यांनी स्त्रियांशी संबंधीत धार्मिक, पारंपारि गोष्टीचा विरोध केला सर्वच क्षेत्रातील स्त्रियांचे अनुभव व जगणे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. स्त्रीवादाने स्त्रीयांचे मुलभूत प्रश्न व समस्या समाज व शासनासह प्रभावीपणे मांडल्या. स्त्रियांचे प्रश्न व समस्याकडे शासन व प्रशासनाचे लक्ष केंद्रीत केले. यासाठी त्यांनी अनेक मार्गांचा अवलंब केला.

यामुळे काही प्रमाणात स्त्रियांच्या समस्यांची सोडवणूक जरी ही पूर्णत: झाली आहे. असे म्हणता येणार नाही परंतु स्त्रीवादाने स्त्रीसमस्येला वाचा फोडली आहे.

* स्त्रिवादाने वैयक्तिक आणि सार्वजनिक कार्य विभागणी नाकारली :-

स्त्रिवादी विचारसरणीने सार्वजनिक क्षेत्रात स्त्रियांना स्थान नसण्यावर आक्षेप घेतला स्त्रि ही पात्र व सक्षम नसल्यामुळे तिला जाणीवपुर्वक डावलले जाते. सार्वजनिक जीवनातील समाजकारण, राजकारण व अर्थकारण पुरुषांनीच करावे याला स्त्रिवादे स्त्रिवादाने विरोध केला. याउलट सार्वजनिक क्षेत्रात व व्यवहारात स्त्रियांनी पुरुषांप्रमाणे समान सहभाग घ्यावा. अशी आग्रही भुमिका मांडली. पुरुषांने स्त्रियांच्या वैयक्तीक जीवनात हस्तक्षेप करु नये. असे मत स्त्रिवादी विचारसरणीने मांडले.

वरील सर्व बाबीतून स्त्रिवादी विचारसरणी स्पष्ट होते.

* स्त्रिवादाचे प्रकार :-

स्त्रिवादाची विचारसरणी स्त्रि शवसनास विरोध करण्यातून निर्माण झाली आहे. सुरुवातीच्या काळात या विचारसरणीचे स्वरूप अराजकीय होते. आज ही विचारसरणी राजकीय बनली आहे. स्त्रियांचे प्रश्न, भुमिका, कार्य याबाबत समाज, अभ्यासक, लेखक, न्यायाधिश, राज्यकर्ते, कुटुंबातील सदस्य या सर्वांमध्ये मतभिन्नता आहे. म्हणून स्त्रिवाद ही बहुआयामी आहे.

वर्तमान राज्यशास्त्रात काही प्रमुख विचारवंत आहेत. ज्यांनी स्त्रिवादाच्या संदर्भात मांडणी केली आहे. यातून स्त्रिवादाची विभागणी खालील प्रकारात केली जाते.

mcq.

1) उदारमतवादी स्त्रिवाद :-

मेरी वुल्फस्टोन क्राफट, जे. एस मिल, मार्गारेट फुल्लर, एलिजाबेथ स्टॅटन, बेथी फ्रिडन, जेनेट रॅड कील्फ इत्यादी नावे उदारमतवादी स्त्रिवाद्यांची आहेत. जॉन लॉक हा उदारमतवादाचा जनक आहे. स्त्री सुद्धा विचारशील, बुध्दीवादी व तर्कयुक्त असू शकते. म्हणून तिला पुरेसे स्वातंत्र्य असले पाहिजे. स्त्रि ही विवेकशील आहे. असे सांगण्यावर उदारमतवादी स्त्रिवादाने भर दिला. रुसोने 'Philosophy of Education' या ग्रंथामध्ये स्त्रियांसाठी कला आणि शृंगार तर पुरुषांसाठी विवेकी शिक्षण सांगितले होते. मेरी वुल्फस्टोन क्राफट यांनी रुसोच्या या विचारांना विरोध केला व स्त्रियांसाठी विवेकी शिक्षणाचा आग्रह केला. बेटी फ्रिडन यांनी 'The Second Stage' या ग्रंथात स्त्रि चळवळीने पुरुषांच्या सहकार्यानेच आपली चळवळ पुढे न्यावी असे सांगितले. उदारमतवादी स्त्रिवाद स्त्रियांच्या शिक्षण, संपत्ती, मताधिकार, रोजगार या हक्कांचे समर्थन करतो तर स्त्रि पुरुषातील लैंगिक व सामाजिक विषमतेला विरोध करतो.

mcq

2) ~~मार्क~~ मार्क्सवादी स्त्रिवाद / समाजवादी स्त्रिवाद :-

यांच्या मते सामाजिक विषमतेचे मुळ कारण भांडवलशाही व्यवस्था आहे. भांडवलशाही व नफा केंद्रबिंदु असणारी व्यवस्था संपुष्टात आणली

रचा स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार व शोषण
माप्त होईल कारण भांडवली व्यवस्थेने स्त्रिला देखील
नफा कमावण्याचे भांडवल समजले आहे. कार्लमार्क्स,
एंजिल्स, रॉबर्ट ओव्हेन, विल्यम थॉमसन व ॲनव्हिलर
इत्यादी मार्क्सवादी स्त्रिवादाचे समर्थक आहेत. स्त्रिया
ह्या पुरुषांच्या गुलामगिरीत अडकलेल्या आहेत.
भांडवलशाही म्हणजेच पुरुषशाही होय. त्यामुळे भांडवल-
शाहीचे उच्चाटन होय. म्हणजेच पुरुषशाहीचे उच्चाटन
होय. भांडवली व्यवस्थेने पुरुषांना भांडवलदारांचा
तर स्त्रियांना काम कामगारांचा दर्जा दिला आहे.
या विचारसरणीच्या मते. स्त्रियांनाही. घरकामाचा
मोबदला मिळायला हवा. कारण आर्थिक परावलंबित्व व
भौतिक वस्तू म्हणून स्त्रिचा उपभोग केला जातो.